**फौ.कि.अर्ज क्र.१९१/२०१९**
**MHSO180008732019**

**अर्ज निशाणी क्र.७३ वरील आदेश**
(पुष्पांजली शिंदे वि. बाळासाहेब शिंदे)

अर्जदाराने प्रस्तुत अर्ज सामनेवालाने मुलगी प्रिती हिचे विवाहावेळी विवाहाचे ठिकाणी जावू नये तसेच कोणत्याही प्रकारे अडथळा निर्माण करू नये, असा आदेश मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**अर्जदाराचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** –

२) अर्जदार व सामनेवाला यांची मुलगी प्रिती हिचा विवाह विधी दि.०२/०६/२०२३ व दि.०३/०६/२०२३ रोजी मयुर क्लासीक मंगल कार्यालय, विजापूर रोड, सोलापूर येथे करण्याचे नियोजीत असून, सामनेवालाने मुलीचे विवाहासाठी काही एक सहकार्य केलेले नाही. याउलट, अर्जदारास धमक्या दिलेल्या आहेत. तरी, सामनेवालाने मुलगी प्रिती हिचे विवाहावेळी विवाहाचे ठिकाणी जावू नये तसेच कोणत्याही प्रकारे अडथळा निर्माण करू नये, असा आदेश होणेविषयी विनंती केली आहे.

३) प्रस्तुतकामी सामनेवालाने नि.क्र.७६ येथे त्यांचे म्हणणे दाखल करून, प्रस्तुत अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारला आहे. सामनेवालाचे म्हणण्यानुसार, त्यांनी कधीही अर्जदारावर मानसिक, शारीरिक अथवा कौटुंबिक हिंसाचार केलेला नव्हता. अर्जदाराने जाणीवपूर्वक प्रस्तुत खोटया मजकूराचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार व सामनेवाला यांचे मुलीचा दि.०३/०६/२०२३ रोजी विवाह असून, त्यांना खूप आनंद आहे. परंतु, अर्जदाराने

जाणीवपूर्वक सामनेवालाची समाजामध्ये नाचक्की करणेच्या हेतूने आणि सामनेवालास मानसिक व शारीरिक त्रास देणेच्या हेतूने मुलीचे विवाह पत्रीकेमध्ये सामनेवाला व त्यांचे नातेवाईकांची नावे नमूद केलेली नाहीत. सामनेवाला हे ३० वर्षे सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्यरत असून, त्यांनी पंचायत समिती सभापती, जिल्हा दुध संघ संचालक, दक्षता कमिटीचे संचालक अशा अनेक पदावर काम केले असून, त्यांचा मोठया प्रमाणावर मित्रवर्ग व समर्थक असताना, केवळ सामनेवालाची समाजामध्ये नाचक्की करणेच्या हेतूने अर्जदाराने अशाप्रकारची वर्तवणूक केली आहे. सदर विवाहाबाबतची कोणतीही माहिती अर्जदाराने सामनेवाला यांना दिली नसल्याने, सामनेवालास मानसिक त्रास झाला आहे. सामनेवालाचा स्वतःचे मुलीवर जीव असून, तिचा विवाह आनंदाने पार पडावा अशी त्यांची इच्छा आहे. न्यायालयाने यापूर्वी सामनेवालाविरूध्द प्रतिबंधात्मक आदेश पारीत केलेले असल्याने, पुन्हा अशा प्रकारचा अर्ज कायदयाने चालणार नाही. केवळ सामनेवालास त्रास देण्याच्या हेतूने विनाकारण चुकीच्या स्वरूपाचा अर्ज दाखल केला आहे. तरी, प्रस्तुत अर्ज नामंजूर करणेविषयी विनंती केली आहे.

४) दोन्ही पक्षकारांचा तसेच त्यांचे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराचे विधिज्ञ श्री. एस.एस. पवार यांनी युक्तीवाद केला की, सामनेवालाने यापूर्वी देखील अर्जदारास शारीरिक व मानसिक त्रास दिलेला आहे. त्याचे वर्तन पाहता, तो सदर लग्नात देखील हरकत अडथळा आणण्याची दाट शक्यता आहे. उलटपक्षी, सामनेवालाचे विधिज्ञ श्री. ए.व्ही. पाटील यांनी युक्तीवाद केला की, सामनेवाला यांस पिता या नात्याने सदर लग्नास हजर राहणेचा हक्क आहे. यापूर्वी न्यायालयाने अर्जदाराचे नि.क्र.५ च्या अर्जावर सामनेवालाविरूध्द प्रतिबंधात्मक आदेश पारीत केले आहेत. अशा परिस्थितीत, अर्जदारास पुन्हा प्रतिबंधात्मक आदेश मागता येणार नाही. सामनेवालाने दि.३०/०५/२०२३ रोजी पुरसिसद्वारे लिहून दिले आहे की, तो सदर

लग्नास उपस्थित राहणार नाही. तरी, प्रस्तुत अर्ज खारीज करणेत यावा. त्याचप्रमाणे स्वतः सामनेवाला व त्याचे वकिल यांनी न्यायालयासमोर कथन केले की, प्रिती ही सामनेवालाची मुलगी असल्यामुळे, तो सदर विवाहामध्ये अडथळा आणणार नाही.

५) सामनेवालाने दि.३०/०५/२०२३ रोजी नि.क्र.७९ कडे पुरसिस देवून असे कथन केले आहे की, त्यांनी मुलीच्या लग्नासंदर्भात कोणतीही धमकी दिलेली नाही, उलट अर्जदाराने लग्नपत्रीकेत सामनेवाला हा मुलीचा वडिल असूनही, सामनेवाला आणि त्यांचे आईवडिल व भाऊ यांची नावे न टाकून अपमानीत केले आहे. तरीही मुलीचे शुभकार्यास अडथळा येवू नये अशी सामनेवालाची इच्छा असून, शुभेच्छा आहेत. सामनेवाला सदर लग्नास हजर राहणार नाही व इतर प्रकारास जबाबदार असणार नाही.

६) अभिलेख व अर्ज पाहिला. सामनेवालाच्या विधिज्ञांचा युक्तीवाद की, एकदा प्रतिबंधात्मक आदेश पारीत झाल्यानंतर पुन्हा न्यायालयास आदेश पारीत करता येणार नाही. महिलांवरील कौटुंबिक अत्याचारापासून संरक्षण कायदयाअंतर्गत पिडीतेला कितीवेळा न्यायालयाकडून प्रतिबंधात्मक आदेश घेता येईल, याबाबत कोठेही नमूद नाही. माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी नि.क्र.५ वरील आदेशात दि.१९/११/२०२१ रोजी सामनेवालाविरूध्द प्रतिबंधात्मक आदेश पारीत केले होते. त्यानंतर अर्जदार व सामनेवाला यांचे मुलीचे लग्न ठरले आहे व त्यासंदर्भात अर्जदाराने प्रतिबंधात्मक आदेश पारीत करावा म्हणून न्यायालयास विनंती केली आहे. नि.क्र.५ वरील आदेशानंतर प्रस्तुतचे कारण घडले आहे व दोन्ही घटनामधील प्रतिबंधात्मक आदेशाचे स्वरूप वेगवेगळे आहे. त्यामुळे, अर्जदारास

प्रस्तुतचा अर्ज दाखल करणेचा अधिकार आहे. सबब, सामनेवालाचा आक्षेप खारीज करण्यात येतो.

७) अर्जातील कथनानुसार, अर्जदार व सामनेवाला यांची मुलगी प्रिती हिचा विवाह सोहळा दि.०२/०६/२०२३ व दि.०३/०६/२०२३ रोजी मयुर क्लासीक मंगल कार्यालय, विजापूर रोड, सोलापूर येथे करण्याचे योजलेले आहे. अर्जदाराची मागणी की, सामनेवालाने मुलीच्या विवाहावेळी विवाहाचे ठिकाणी जावू नये तसेच कोणत्याही प्रकारे अडथळा निर्माण करू नये. अर्जदार व सामनेवाला यांच्यातील विवाहसंबंध अद्याप अस्तित्वात असून, त्यांना सदर लग्नसंबंधातून मुलगी प्रिती व मुलगा यज्ञ ही अपत्ये असलेबाबत कोठेही वाद नाही. सामनेवाला हा प्रिती हिचा पिता असल्यामुळे, अर्जदार मागणी करत असल्याप्रमाणे त्यांस विवाहावेळी विवाहाच्या ठिकाणी जावू नये, असा प्रतिबंधात्मक आदेश देणे न्यायोचित ठरणार नाही. परंतु, स्वतः सामनेवाला यांनीच काल दि.३०/०५/२०२३ रोजी नि.क्र.७९ कडील पुरसिस देवून, त्यामध्ये असे नमूद केले आहे की, ते सदर लग्नास हजर राहणार नाहीत. त्यामुळे, सामनेवाला यांना सदर लग्नास हजर राहणेपासून प्रतिबंध करणेबाबत आदेश करणेची गरज नाही. अर्जातील दुसरी मागणी की, सामनेवाला यांनी सदर विवाहात कोणत्याही प्रकारे अडथळा निर्माण करू नये. यासंबंधी जरी सामनेवाला यांनी त्यांची पुरसिस नि.क्र.७९ कडे काहीही नमूद केले नसले तरी, सामनेवाला यांनी स्वतः न्यायालयासमोर काल दि.३०/०५/२०२३ रोजी व आज दि.३१/०५/२०२३ रोजी कथन केले आहे की, ते सदर लग्नात कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा आणणार नाहीत. तरीही, लग्न निर्विघ्नपणे पार पडावे म्हणून अर्जदार व तिचे विधिज्ञांची मागणी की, त्याबाबत स्पष्ट आदेश पारीत व्हावा. त्या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुत अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. सामनेवाला यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी नि.क्र.७९ वरील दिलेल्या पुरसिसप्रमाणे दि.०२/०६/२०२३ व दि.०३/०६/२०२३ रोजी विवाहावेळी व विवाहस्थळी मयुर क्लासीक मंगल कार्यालय, विजापूर रोड, सोलापूर येथे जावू नये.

३. सामनेवाला यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी दि.०२/०६/२०२३ व दि.०३/०६/२०२३ रोजी होणा–या विवाहामध्ये कोणत्याही प्रकारे अडथळा निर्माण करू नये.

४. पक्षकारांना सदर आदेशाची प्रत विना शुल्क देण्यात यावी.

Digitally signed by SHRUTI NILESH GANGWAL SHAH
Date: 2023.05.31 16:52:23 +0530

**(श्रीमती श्रुती नि. गंगवाल–शाह)**

दिनांक – ३१/०५/२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगळवेढा

## <u>CERTIFICATE</u>

I affirm that the contents of this P.D.F. file Order is same word to word, as per the original Order.

(a) Name of the Stenographer : A.P. Hipparagi,

(b) Name of the Court : C.J..J.D., Mangalwedha, Dist. Solapur,

(c) Order signed by P.O. on : 31/05/2023

(d) Order uploaded on : 31/05/2023